## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.१८/०१/२०१८
## दि.१७/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे २१/१८,भादविक १४३,१४७,१४८,१४९,महाराष्ट्र पोलीस ॲक्ट क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | सचिन अडागळे,वय-३५ वर्षे,रा.औंधगाव,पुणे |
| **आरोपी** | सात ते आठ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०१/२०१८ रोजी १५/१५ वा. भाजी मंडई जवळील मोकळया जागेत औंधगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी मोटार सायकलवरुन आलेल्या मुलांना त्यांची गाडी हळु चालविण्यास सांगितल्याचे कारणावरुन,सदर इसमांनी बेकायदेशीररित्या जमाव जमवुन,त्यांचे हातात कोयत्या घेवुन येवुन नमुद ठिकाणी पार्क केलेल्या पॅगो टेम्पो,मारुती ओमनी व ईको कार या तीन्ही गाडयांची पुढील व मागील बाजुच्या काचा फोडुन,सदर वाहनांचे नुकसान करुन निघुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. फड |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे ३०/१८,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | रमेश भोंग,वय-३८,रा.नवी सांगवी,पुणे |
| **आरोपी** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७ मे २०१७ ते आजपावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद तीन इसमांनी फिर्यादी यांना नामांकीत फायनान्स कंपनी मध्ये कर्ज मिळवुन देण्याचे अमिष दाखवुन,त्यांचेकडुन वेळोवेळी बॅकेतुन ऑनलाईन माध्यमाव्दारे आरटीजीएस करून ५,१८,०००/- रुपये घेवुन फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बागुल |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे २३/१८,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | मानसी ठाकुर,वय-२३ वर्षे,रा.धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०७/२०१७ रोजी ते दि ०१/०८/२०१७ रोजीपर्यंत पेटीएम अकांऊन्टवरुन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादी यांना फोन करून त्यांना एका नामांकीत कंपनीचे नावाने कॉल करुन,फिर्यादी यांचा रिझुम शॅार्टलिस्ट झाले आहे असे सांगुन,त्यांचेकडुन पेटीएम अकांऊन्टवरुन ऑनलाईन माध्यमाव्दारे वेळोवेळी पैसे भरायला सांगुन,फिर्यादी यांची एकुण २६,०८०/- रुपयेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अजय भोसले ९८६७२०२८२१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ३५/१८,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | गिरीष तेजवाणी,वय-३४,रा.वैष्णवीदेवी,पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०१/१७ ते आजपावेतो वंडर कार,टेल्को,चिंचवड,पुणे येथे |

**तपशिल** यातील नमुद मोबाईलधारक यांनी फिर्यादी यांना “GLOBLE MARKETING MANAGE MENT DWC LIC UAE” या आमचे कंपनीतर्फे तुम्हाला भारतातील एकमेव आयातदार व वितरक बनवितो असे अमिष दाखवुन,त्यांचेकडुन ४८ लाख रुपये घेवुन “F BEVERAGES” या कंपनीचा सन २०१७-१८ या कालावधी मध्ये मदयार्क असलेले किंवा नसलेले पेय फिर्यादी यांना न देता त्यांचे पैसे परत न करता नमुद रकमेची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. ढुबल ९८८१२३४७२३

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ३७/१८,भादविक ४२०,३४

**फिर्यादी** विशाल गायकवाड,वय-२३ वर्षे,रा.मोझे आळी,लोहगाव,पुणे

**आरोपी** तीन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** सुमारे तीन ते चार दिवसांपुर्वी दि.१४/०१/२०१८ रोजी १९/०० वा.शॉप नं.बी-९,श्रीराम लोटस बिल्डींग,वडगाव-शिंदे रोड,पुणे व आंबेडकर चौका जवळ पोते वस्ती,येरवडा पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे सुमारे तीन ते चार दिवसांपुर्वी त्यांचे दुकानात हजर असताना,एका इसमाने फिर्यादी यांना २० अमेरिकन डॉलर दराच्या १६७३ नोटा असल्याचे सांगुन,त्यांना २० अमेरिकन एक नोट देऊन त्यांना आणखीन जादा नोटा देण्याचे आमिष दाखवुन,त्यांना आंबेडकर चौका जवळ पोते वस्ती,येरवडा पुणे येथे बोलवुन घेवुन,त्याचे इतर साथीदारांसह येवुन त्यांचेकडिल कापडी पिशवी मध्ये अमेरिकन डॉलर असल्याचे फिर्यादी यांना भासवुन त्यांचेकडुन ४ लाख रुपये घेवुन,फिर्यादी यांना कापडी पिशवी मध्ये हातरुमालात वृत्तपत्राचे कागद व साबणाची वडी बांधुन देऊन हातचलाखी करून,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक करून त्यांना ४ लाख रुपये देण्यास भाग पाडले आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. मारोडे ९६८९३१५०२०

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** दत्तवाडी पो स्टे ३४/१८,भादविक ३७९

**फिर्यादी** जगन अहिरे,वय-५५,रा.जाधवनगर,वडगाव-बुद्रुक,पुणे

**आरोपी** अज्ञात इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१९/१२/२०१७ रोजी २०/०० वा. ते दि.२०/१२/२०१७ रोजी सकाळी ०७/०० वा.चे दरम्यान निलायम ब्रीजचे रोडवर असलेले विद्युत खांबावर बसविलेले एलईडी दिवे

**तपशिल** वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,निलायम ब्रीजचे रोडवर असलेले विद्युत खांबावर बसविलेले ३०,०००/- रू किंमतीचे एकुण १० एलईडी दिवे फिलीप्स कंपनीचे प्रत्येकी ३६ व्हॅटचे ब्रॅकेटसह कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली आहेत.

**त.अंमलदार** पो.हवा. रवि फुलपगारे ७३५०००८९९५

## <u>दि.१८/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** दत्तवाडी पो स्टे ३५/१८,भादविक ३०७,१४३,१४७,१४८,१४९,महा.पो.अधि.क.३७(१)१३५, भारतीय हत्यार का.क.४(२५),क्रिमी.लॉ अमेंडमेंड का.क.३,७

**फिर्यादी** सुरज कांबळे,वय-२२,रा.पर्वती दर्शन,पुणे

**आरोपी** १० ते १२ इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१७/०१/२०१८ रोजी २३/०० वा. एस.टी. कॉलनी,पुणे-सातारा रोड,पर्वती दर्शन,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी त्यांचे मित्रासह गप्पा मारत उभे असताना,यातील नमुद १० ते १२ इसमांनी फिर्यादी यांचा मित्र अभिजीत अडागळे व सोन्या उर्फ विराज खंडागळे यांचेतील सुमारे तीन दिवसापुर्वी झालेला वाद मध्यस्ती करून मिटविल्याच राग मनात धरून फिर्यादी यांना कोयत्याने वार करून त्यांना गंभीर जखमी करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच वस्तीतील लोकांचे वाहनांची तोडफोड करून नुकसान केले आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) के.व्हि.इंदलकर ९९२३६९४५१२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३८/१८,भादविक ३०७,१४३,१४४,१४७,१४८,५०४,महा.पो.अधि.क.३७(१)(३) १३५,भारतीय हत्यार का.क.४(२५) |
| **फिर्यादी** | राहुल कांबळे,वय-२०,रा.राजेंद्रनगर दत्तवाडी,पुणे |
| **आरोपी** | १.किरण उर्फ कांबळे,वय-२०,रा.महादेवनगर,हिंगणे-खुर्द,पुणे २.वसीम महमद शेख,वय-२५, रा.महादेवनगर,हिंगणे-खुर्द,पुणे ३.पंकज बळीराम गायकवाड,वय-१९,रा.महादेवनगर,हिंगणे-खुर्द,पुणे ४.साजीद युनुस मुलाणी,वय-२५,रा.महादेवनगर,हिंगणे-खुर्द,पुणे ५.निखील विष्णु पांचाळ,वय-१९,रा.साईनगर,हिंगणे-खुर्द,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०१/२०१८ रोजी २१/३० वा. रॉयल इनफिल्ड बुलेट सर्व्हिस सेंटर जवळ,राजेंद्रनगर, हिंगणे-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करून,'तु दत्तवाडी मध्ये राहतो का,तु आमच्या भागात कशाला आलास,तुमच्या ग्रुपच्या लोकांना जास्त माज आला आहे.' असे म्हणुन फिर्यादी यांचे डोक्यावर व पाठीवर कोयत्या सरख्या हत्याराने वार करून,त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्हि.बी.जगताप ९०२८१५१७१३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**